अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर

## पत्नीस आत्महत्येस प्रवृत्त ; पतीसह सासू,नणंदवर गुन्हा

**सोलापूर** : मूल-बाळ होत नाहीत म्हणत आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीसह सासू,नणंद यांच्याविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आलिया जाविद शेख (वय-२३,रा. पोगुल मला,रामवाडी) असे आत्महत्येस प्रवृत्त करण्यात आलेल्या मुलीचे नाव आहे. ही घटना दि.१ मे २०२३ ते २५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत दरम्यान पोगुल मला रामवाडी येथे घडली. याप्रकरणी अहमद मगबुल वालीकर (वय-४०,रा.मु.पो.तांडुर, ता.मंगळवेढा) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून जाविद कय्युम शेख (वय-३०),रज्जु कय्युम शेख (वय-५०) व रुबीना कय्युम शेख (वय-३३,रा. पोगुल मला, रामवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

आलिया शेख (मयत) हिला तिचे पती जाविद,सासु रज्जु व नणंद रुबीना या तिघांनी मिळून त्रास दिला. तुझ्या आई-वडिलांनी लग्नात चांगल्या प्रकारे साहित्य दिले नाहीत.

तसेच तुला मुलं बाळ होत नाही असे वारंवार म्हणून शिवीगाळ करत मारहाण केली.त्यानंतर तिला मानसिक त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केले आहे,असे फिर्यादीत नमूद आहे. तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक खामकर या करीत आहेत.



# आ. कल्याणशेट्टींना विकासकामांची पोहच मिळाली; म्हेत्रे-पाटलांचा ऐनवेळी झालेला दोस्ताना नाकारला


**अक्कलकोट/प्रतिनिधी**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मतदार संघाच्या मुलभूत गरजा ओळखून गेल्या ५ वर्षात केलेल्या विविध विकास कामाची पोचपावती मतदारांनी दिली आहे. काँग्रेसचे पराभूत उमेदवार माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे व माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्यात ऐनवेळी झालेला राजकीय दोस्ताना हा तडवळ भागातील मतदारांनी चक्क नाकारल्याचे दिसून आले.



एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून अक्कलकोट तालुक्याकडे पाहिले जायाचे. मात्र पुसून काढण्याचे काम विविध विकासकामांचे माध्यमातून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले आहे. आ. कल्याणशेट्टी यांच्या विजयानंतर विकास पर्व -०२ ला सुरुवात झालेली आहे. त्यांच्याकडे आगामी पंचवार्षिक योजना तयार असून, विकासाचा बँकलॉग आ.कल्याणशेट्टी यांनी भरून काढतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आ.कल्याणशेट्टी यांचे गत पंचवार्षिक निवडणुकीतील मताधिक्य पाहता त्यांनी स्व:ताचेच रेकॉर्ड मोडीत काढले आहेत. मतदार संघातील अक्कलकोट व दक्षिण तालुक्यातील गाव, वाड्या, वस्त्या, तांड्यात समतोल विकास करून ग्राम समृद्धीला प्राधान्य दिले. यासह तालुक्यातील अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी न पा शहरा करिता देखील विविध योजना राबविल्या. केलेल्या विविध विकास कामामुळे एक अशवासक चेहरा म्हणून मतदार संघातील मतदारांनी दिलेली साथ, या निवडणुकींच्या निकाला वरून स्पष्ट होत आहे.



तालुक्यातील जनतेला दिलेला शब्द प्रमाण मानून आ.कल्याणशेट्टी हे केंद्र व राज्यशासनाच्या अनेक योजना मतदार संघाकरिता राबविण्यात आल्या. ते त्या प्रमाणात उल्लेखनीय ठरल्या आहेत. निवडणुकीच्या सुरुवाती पासूनच काँग्रेसची यंत्रणा ही प्रभावी नव्हती. काँग्रसमध्ये सुसूत्रता दिसली नाही आणि मित्र पक्षाच्या बडा नेता दिसलेला नाही. गेल्या पंचवार्षिक मध्ये विरोधी पक्ष म्हणून जनहिताची कामे शून्य, चमकोगिरी पाहायला मिळाली. याचा जास्त फटका काँग्रेसचे उमेदवारला बसला आहे. भाजपची प्रचार यंत्रणा मतदार संघात व्यापलेली होती. काँग्रेसला ज्या ठिकाणी मताधिक्य मिळण्याची शक्यता होती, त्याठिकाणी भाजपाला १० ते १५ हजारांचे मताधिक्य मिळाले आहे. एकूणच म्हेत्रे-पाटील या मातब्बर नेत्यांना युवक आमदार असलेले कल्याणशेट्टी यांनी चक्क एका दगडात दोन पक्षी मारून मतदार संघातील राजकीय प्रभाव टिकवण्यात यशस्वी झाल्याची जोरदार चर्चा सद्या सुरु आहे.

### या कारणांनी झाला कल्याणशेट्टींचा विजय

आ.कल्याणशेट्टी यांनी मतदार संघात थेट संपर्क, प्रचाराचे सुक्ष्म नियोजन व यंत्रणा, सभा, महिला व युवक वर्गाचा समावेश, शासनाने सुरु केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली. याबरोबरच शेती पंप वीज माफी, उजनीचे पाणी कुरनूर धरणात आणण्याची मागणी पूर्णत्वास नेली. मतमोजणीच्या अंतिम फेरीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना १,४८,१०५ तर काँग्रेसचे म्हेत्रे यांना ९८,५३३ मते मिळाले असून, म्हेत्रे यांचा सुमारे ५० हजाराच्या फरकाने दारूण पराभव झाला आहे.



सामूदायिक संविधानाचे वाचन करताना आनंद चंदनशिवे, संतोष पवार, किसन जाधव यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रवादीकडून सामूदायिक संविधानाचे वाचन

**सोलापूर** : संविधान दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रसकडून सामूदायिक संविधानाचे वाचन कार्यक्रम राज्यभरात राबवण्यात आला. सोलापुरातही याचे आयोजन करण्यात आले होते. जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले यांच्या हस्ते विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर संविधान वाचन झाले. या प्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांच्या नेतृत्वात आंबेडकर चौक येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, श्रीनिवास कोंडी, अनिल उकरंडे, आनंद मुस्तारे, महेश निकंबे, फारूक मटके, माजी नगरसेवक गणेश पुजारी, पक्षाचे जनरल सेक्रेटरी प्रमोद दादा भोसले, युवक अध्यक्ष सुहास कदम,युवक प्रदेश सरचिटणीस महेश कुलकर्णी, सेवा दल अध्यक्ष प्रकाश जाधव, दत्ता बडगंची व पदाधिकारी उपस्थिती होते.

## राजकारणातून निवृत्तीची आडम यांची घोषणा
### कामगारांसाठी मरेपर्यंत लढाई लढणार असल्याची स्पष्टोक्ती

**सोलापूर/प्रतिनिधी**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे माजी आमदार नरसय्या आडम मास्तर यांनी निवडणुकीच्या राजकारणातून निवृत्ती जाहीर केली आहे. मात्र, कामगारांचे प्रश्न घेऊन मरेपर्यंत रस्त्यावरची लढाई लढली जाईल. रस्त्यावरची लढाई लढतच मरण पत्करेन, असेही माजी आमदार आडम यांनी स्पष्ट केले. दत्त नगर येथील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

राजकारणातून घेतलेली निवृत्तीचा निर्णय कोणत्याही परिस्थितीत अंमलात आणला जाईल. पण सोलापूरमधील कामगार, कष्टकऱ्यांची चळवळ यापुढच्या काळात चालू ठेवण्यासाठी नवं नेतृत्व उभे करण्यात येईल. आमच्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात वारसदार नेमण्याची पध्दत नाही. हा काही संपत्ती वाटून घेण्याचा प्रकार नाही. जो चळवळीत पुढे जाईल, त्या माणसाला पक्षाचे नेतृत्व मिळेल, असेही आडम म्हणाले.

माझं वय आता ऐंशीपर्यंत आलेले आहे.

आता कुठंतरी थांबलं पाहिजे, या विचारातूनच मी निवडणुकीच्या राजकारणातून निवृत्ती घेण्याचा निर्णय मी घेतला आहे. मात्र, कामगारांची चळवळ मरेपर्यंत चालूच राहणार आहे, असेही आडम मास्तर यांनी स्पष्ट केले. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत आपल्याला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. काहीही करून आडम मास्तर यांना पाडा. हिंदू-मुस्लिम करून कामगारांमध्ये मोठ्या प्रमाणात फूट पाडण्यात आली, त्यामुळे नुकत्याच झालेल्या निवडणुकीत माझा पराभव झाला, हा माझा प्राथमिक निष्कर्ष आहे, असेही आडम यांनी नमूद केले.

### मध्यची निवडणूक रद्दसाठी न्यायालयात जाऊ

सोलापूर शहर मध्य मतदारसंघाची निवडणूक निर्भय आणि निस्पष वातावरणात झालेली नाही. तसेच ईव्हीएम मशीनमध्ये फेरफार या मुद्यांवरून सोलापूर शहर मध्य मतदारसंघाची निवडणूक रद्द करण्यात यावी, यासाठी आपण यांनी उच्च न्यायालयात जाणार आहोत, असेही आडम यांनी स्पष्ट केले. कामगार माझ्याकडे अजूनही रडत येतात, याचा अर्थ काय काढायचा. यावरून ईव्हीएम'मध्ये गडबड असल्याच्या निष्कर्षांपर्यंत आम्ही आल्याचे ते म्हणाले.

### मग मतं गेली कुठे?

मी हजारो लोकांना घरे मिळवून दिली आहेत. पण, तेवढीही मते मला मिळताना दिसत नाहीत, याचं शल्य वाटण्याचे काही कारण नाही. कारण ते लोक म्हणतात की, आम्ही तुम्हालाच मतदान केलेले आहे. मग मतं गेली कुठे. हा संशोधनाचा विषय आहे, म्हणूनच आम्ही उच्च न्यायालयात जात आहोत. न्यायालयात आम्हाला न्याय मिळेल, अशी अपेक्षा आहे, असे आडम म्हणाले.



ईव्हीएम'च्या संदर्भात आम्ही उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत. त्यातून सोलापूर शहर मध्य मतदारसंघाची निवडणूक रद्द होईल. नव्याने निवडणुका लागतील आणि कोणीतरी आमचा माणूस उभा राहील आणि चमत्कार करून दाखवेल, अशी अपेक्षाही नरसय्या आडम यांनी बोलून दाखवली.

## नरोटे, काडादींसह १५९ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त

**सोलापूर** : सोलापूर जिल्ह्यात १८४ उमेदवार अकरा विधानसभा मतदारसंघातून आपले नशीब आजमावत होते. भारतीय जनता पक्षाचे पाच उमेदवार निवडून आले असून महाविकास आघाडीचे सहा उमेदवार निवडून आले आहेत. मात्र, जिल्ह्यातील तब्बल १५९ उमेदवारांना आपले डिपॉझिट वाचवता आलेले नाही.

अकरा विधानसभा मतदारसंघात निवडणुकीसाठी उतरलेल्या १८४ उमेदवारांपैकी तब्बल १५९ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. यामध्ये काँग्रेसचे अधिकृत उमेदवार चेतन नरोटे यांच्यासह सोलापूर दक्षिणमधील बडे नेते धर्मराज काडादी, माजी आमदार नरसय्या आडम मास्तर यांचाही समावेश आहे. सोलापुरातील १८४ उमेदवारांपैकी १५९ उमेदवारांना एकूण वैध मतांच्या एक षष्टमांश मते मिळवता आलेली नाहीत. त्यामुळे निवडणूक लढविणाऱ्या १५९ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. त्यातून सरकारला तब्बल १२ लाखांचा महसूल मिळाला.

## बाजार समितीमध्ये कांद्याची आवक वाढली
### चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी समाधानी

**सोलापूर** : सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ४०० ते ५०० क्विंटल कांद्याची आवक रोज सोलापूर परिसरातून होत आहे.सध्या ५०० ते ७५० प्रति क्विंटल भाव मिळत असल्याचे कांदा विभागाच्यावतीने सांगितले आहे.



सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत स्थानिक शेतकऱ्यांनी पिकवलल्या कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढतच आहे.गेल्या १५ दिवसांपासून सरासरी ४५० ते ५०० ट्रक आवक होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी उत्पादन केलेला योग्य प्रतीचा ३३ हजार क्विंटल कांद्याची आवक झाली आहे. सरासरी ५०० ते ७५० रुपये प्रति क्विंटल भाव मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त केले जात आाहे. तरी देखील आजचा भाव उद्या मिळणार नाही.या हेतूने मोठ्या प्रमाणात आवक होत आहे. सोलापूर बाजार समिती परिसरातील पाचही गोदाम परिसरात कांदा साठवणूक सुरू आहे.दिवसाआड कांदा लिलाव होत असल्याचे कांदा विभागातील कर्मचाऱ्यांनी सांगितले आहे.

> कांदा विक्रीसाठी आणला असता दोन दिवस लिलावासाठी वाट पहावी लागत आहे.कांदा उघड्यावर ठेवण्यात येत असून चोरी होऊ नये म्हणून शेकोटी पेटवत राखण करावी लागत आहे.
> **–तुळशीराम पवार, शेतकरी, दक्षिण सोलापूर.**

## डिसेंबरपासून पाचवी ते आठवीची स्कॉलरशिप सराव परीक्षा

**सोलापूर** : जिल्ह्यातील इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची डिसेंबर पासून स्कॉलरशिप सराव परीक्षा सुरू होणार असल्याची माहिती जि.प.चे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले. फेब्रुवारी महिन्यात स्कॉलरशिप परीक्षा होणार आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या पाचवी पर्यंत विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेण्याची तयारी सुरू आहे. या स्कॉलरशिप परीक्षेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना बुद्धिमत्ता भाषा व गणित या विषयाचा अभ्यास घेणाऱ्या शिक्षकांसाठी जिल्हास्तरावर कार्यशाळा घेण्यात येणार आहे. यंदाच्या वर्षी चौथी व सातवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेला विद्यार्थी पुढील वर्षी शिष्यवृत्तीची परीक्षा देणार आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून प्रज्ञाशोध परीक्षा घेऊन त्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक कौल घेण्यात येणार आहे. या परीक्षा संदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे गटशिक्षण अधिकारी शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची बैठक घेऊन योग्य त्या सूचना दिल्या आहेत. सोलापूर जिल्हा परिषद शाळेत सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. त्यानुसार निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे, असे शेख यांनी सांगितले.

## गांजाची झाडे लावल्याप्रकरणी आरोपीला हायकोर्टात जामीन

**सोलापूर** : उत्तर सोलापूर राळेरास येथे आपल्या शेतजमीनीत बेकायदेशीररित्या ११७० गांजाची झाडे लावल्याप्रकरणी संशयित आरोपी मुरार नागनाथ ढोकळे याला मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. ढोकळे याने शेतजमिनीत अवैध गांजाची झाडे लावल्याच्या माहितीवरुन पुणे कस्टम अधिकाऱ्यांनी संशयित आरोपीच्या शेतजमिनी मध्ये छापा टाकला असता सदर शेतजमीनीमध्ये संशयित आरोपीने अवैध गांजाची झाडे लावलेली आढळून आली. याप्रकरणी पुणे कस्टम अधिकाऱ्यांनी पुणे कस्टम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला होता. त्या नंतर संशयित आरोपी मुरार ढोकळे याला अटक करण्यात आली. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुद्ध सत्र न्यायालयात दोषारोप पत्र केले. सत्र न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला. त्यानंतर आरोपीने जामीन मिळण्याकरिता मुंबई उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. या जामीन अर्जाच्या सुनावणी दरम्यान आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीचा जामीन अर्ज मंजूर करण्यात आला आहे. यात आरोपीतर्फे ॲड. विक्रांत फताटे, ॲड. विशाल वाघेला यांनी तर भारत सरकारतर्फे ॲड. दशरथ दुबे, सरकारतर्फे ॲड. प्रसन्ना मालशे यांनी काम पाहिले.

### तिसरा डोळा
– प्रकाश पोरे



त्यांच्या बोलण्याचे आता काहीच वाटत नाहिये!

कल्याण
346-34-400
मुंबई
136-05-113

## फडणवीस मिरगणेंच्या झोपडपट्टीमुक्त अभियानाला पाठबळ देतील का?

**बार्शी/प्रतिनिधी**

**महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाचे कॅबिनेट मंत्री दर्जा माजी सहअध्यक्ष आणि गृहनिर्माण मंत्रालय सल्लागार समितीचे विद्यमान अध्यक्ष राजेंद्र मिरगणे यांनी नुकतीच देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. दोघांच्या चर्चेदरम्यान मिरगणे यांनी महत्त्वकांक्षी झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र अभियानाचे सूतवाच केले आहे. आता फडणवीस हे मिरगणे यांना पाठबळ देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

मिरगणे यांनी २०१४ साली भाजपाकडून बार्शी विधानसभेची निवडणूक लढविली त्यानंतर त्यांनी मोठे पक्ष कार्य केले. व्यक्तिकेंद्रीत राजकारणाला फाटा देत मिरगणे यांनी बार्शीत पक्ष कार्य वाढवले. मिरगणे यांनी परवडणारी घरे ही संकल्पना मांडली.. मिरगणे यांची ही संकल्पना उचलून धरत फडणवीस यांनी आपली राजकीय इच्छाशक्ती वापरत महा हाऊसिंग ची निर्मिती केली. त्या महामंडळाचे अध्यक्ष स्वतः मुख्यमंत्री फडणवीस होते. मिरगणे यांना सहअध्यक्ष पद देऊन फडणवीस यांनी त्यांच्यावर विश्वास दर्शविला. या पदाच्या

### गेमचेंजर प्रकल्प ठरण्याचा दावा





कार्यकाळात १८ महिन्यात मिरगणे यांनी विविध कल्पक योजना राबवल्या. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर मिरगणे यांनी हे पद सोडले.

मिरगणे यांची बेघरांना अत्यल्प किमतीमध्ये मालकीचे घर देण्यासाठी मांडलेली तांत्रिक व विविध आघाड्यांवरची कल्याणकारी भूमिका फडणवीस यांनी आग्रहीपणे पुढे नेली. त्यानंतर फडणवीस यांनी मिरगणे यांना राज्याच्या गृहनिर्माण मंत्रालय तसेच झोपडपट्टी पुनर्विकास महा हाऊसिंग आणि म्हाडा यांचे सल्लागारपद दिले. व राज्यातील शासकीय गृहनिर्माण विषयक धोरण नव्याने निर्माण करण्याची जबाबदारी सोपविली.

आता राज्यात येणारे सरकार हे मजबूत बहुमताचे आहे अर्थातच या सरकारवर फडणवीस यांची पकड आहे. त्यामुळे फडणवीस हे मुक्त हस्ताने मिरगणे यांना पाठबळ देतील अशी आशा आहे.

मिरगणे यांनी महत्त्वकांक्षी झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र अभियानाचे सुतोवाच केले आहे. फडणवीस यांनी ही कल्पना गेमचेंजर प्रकल्प म्हणून अंमलात आणण्याच्या दृष्टीने पावले उचलली तर राज्यात भाजपाची लोककल्याणकारी प्रतिमा अधिक वर्धमान होणार आहे. त्यामुळे फडणवीस यांचे विश्वासू सहकारी असलेल्या मिरगणे यांना नूतन सरकारच्या माध्यमातून फडणवीस कसे पाठबळ देतात याकडे तालुक्याचे लक्ष आहे.